क्र.२/नसवि/महासभा/ ०३ /२०११-२०१२
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- १० जून २०११

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०३ /२०११-२०१२

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक १८ /०६/२०११ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

१०/६/११

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. *मागील सर्वसाधारण सभा दि.१९/०५/२०११ चे कार्यवृत्त वाचून कायम करणे.*

२. *सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -*
   अ) दु:खवठ्याचे ठराव.
   ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका अस्तीत्वात आलेनंतर तत्कालीन नगरपरिषेदेचे माजी नगराध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी आणि महानगरपालिकेचे विद्यमान सदस्य यांचे दु:खद निधनानंतर, त्यांना श्रध्दांजली म्हणून त्या दिवशी महानगरपालिकेचे प्रशासकीय कामकाज बंद ठेवून सुट्टी जाहीर करावी यासाठी महासभा ठराव क्रमांक.२१० दिनांक २०/०३/१९९९ अन्वये धोरणात्मक मान्यता दिली आहे. त्यानुसार कार्यवाही ठेवणेत येत आहे. तथापि, महानगरपालिकेचे वाढते दैनंदिन कामकाज व सार्वजनिक सुट्टयांचा विचार करता या कामी तत्कालीन नगरपरिषदेचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि महापालिका अस्तित्वात आले पासुन मा.महापौर , मा.उपमहापौर आणि विद्यमान सदस्य असे सुधारीत धोरण ठरविणे कामी विचारार्थ निर्णयार्थ आलेले **उपायुक्त (प्रशावि) यांचे दि.०८/०६/२०११ चे विषयपत्र.**

महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.२४ मधील अष्टविनायक नगर कुपवाड येथे, दुपारी ४ ते ६ या वेळेत ॲलोपॅथिक दवाखाना सुरु करणेस व त्या साठी श्री. बिरु मारुती माने, यांची जागा सहा.संचालक नगररचनाकार यांनी निश्चित केले प्रमाणे, प्रतिमहा रुपये. ११००/- या प्रमाणे भाड्याने घेणेस धोरणात्मक मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (आरोग्यविभाग)यांचे दि. ०७/०५/२०११ चे विषयपत्र.**

६. मुंबई प्रातिक मनपा अधिनियम १९४९ च्या कलम ४५६ (अ) व अधिनियमातील इतर तरतूदीनुसार महानगरपालिका मधील विविध पदावर करावयाच्या नियुक्त्यांचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवाप्रवेश नियमास शासन परिपत्रकानुसार महासभा ठराव क्र.२९ दि.१८/०७/२००९ अन्वये मान्यता दिली होती. प्रस्तुत सेवाप्रवेशा नियमावर सूचना व हरकती मागविण्यात आलेल्या होत्या. प्राप्त झालेल्या सुचना हरकतींचे निराकरण करुन दुरुस्त केलेल्या सेवाप्रवेश नियमास अंतिम मान्यता देणेस व मान्यतेसाठी मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१०/०६/२०११ चे विषयपत्र.**

७. केंद्रशासनाच्या आय.एच्.एस.डी.पी. योजने अंतर्गत सुरु झालेल्या व मंजूर असलेल्या घरकुल योजनेसाठी अंतिरिक्त रक्कम रुपये. २२ कोटी आवश्यक आहे. सदरची अंतिरिक्त रक्कम १३ व्या वित्त आयोगामधून, नगरोत्थान योननेमधून व दलित वस्तीसुधार योजनेमधून उपलब्ध करणेसाठी मा.शासनाच्या सामाजिक व न्याय विभागाकडे तसेच मा.जिल्हाधिकारी,सांगली. यांचेकडे प्रस्ताव सारद करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (नादानिक)यांचे दि. १८/०५/२०११ चे विषयपत्र.**

८. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील विविध कामगिऱ्या मक्तेदारांच्याकडून करुन घेतल्या जातात महासभा ठराव क्रमांक. २४ दि.११/०४/२०११ अन्वये मक्तेदार नोंदणीसाठी दिलेली मुदत दि. ३१/०३/२०११ रोजी संपूष्टात आली आहे. मागील तीन वर्षांसाठी नोंदणी प्रमाणपत्र मक्तेदारांना जून,२०११ पर्यंत मुदतवाढ देणेस व शासन निर्णयानूसार पुढील पाच वर्षांसाठी मक्तेदार नोंदणीसाठी फी निश्चित करुन नव्याने नोंदणी करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१०/०६/२०११ चे विषयपत्र.**

९. सांगली मिरज आणि कुपवाड शहर विकास आराखडा (सी.डी.पी) प्रकल्प अहवाल तयार करणे कामी क्रिसील रिस्क ॲंड इन्फ्रास्ट्रक्चर सोलुशन्स लि. मुंबई या सल्लागार कंपनीस वर्क ऑर्डर देणेत आली होती. सदर सल्लगार एजन्सीने तयार केलेला कच्चा शहर विकास आराखडा सादर केलेला आहे. सदरचा आराखडा अवलोकनी घेवून, त्यावर चर्चा करुन आवश्यक ते बदल सुचवून शहर विकास आराखडा अंत्तीम करुन मा. शासनाकडे सादर करणेस मान्यता देणे कामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि. १०/०६/२०११ चे विषयपत्र.**

१०. मिरज शहराच्या वाढीव हद्दी मंजूर नकाशानुसार स.नं.५०/२अ/१अ/ व ५०/२ब/१ ही जागा क्रिडांगण या आरक्षणाने आरक्षीत होती. सदर जागेचे मालक श्रीमती. जयश्री सुरेश चौगुले, यांनी आरक्षीत जागेची नुकसान भरपाई मागणी केली होती. त्यानुसार सन २००६ च्या बाजार भावाप्रमाणे सदर जागेची नुकसान भरपाई र.रु.१८,११,२००/- मात्र, अदा करणेस महासभा ठराव क्र.१९३ दि.२८/०१/२००८ अन्वये प्रस्ताव नामंजूर करणेत आला होता. सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेमध्ये महासभा ठराव क्र.१०८ दि.१६/११/२००९ अन्वये सदरचे आरक्षण कायम ठेवले आहे. प्रस्तुतकामी महासभा ठराव क्र.१९३ अन्वये नुकसान भरपाई नामंजूर केलेबाबत जागामालक यांनी मा. लोकायुक्त, महाराष्ट्र राज्य, यांचेकडे तक्रार केली असता, सदर तक्रारीची सुनावनी होवून तक्रारदार यांना जमिन परत करणे किंवा एक महिन्याच्या आत नुकसान भरपाई देणेकामी निर्देश दिले आहेत. मिळकरधारकास जमिन परत करणे अथवा नुकसान भरपाई देणेकामी निर्णय होणेबाबत. **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१०/०६/२०११ चे विषयपत्र.**

११. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

१२. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०६/२०११

ठराव क्रमांक :- १५

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.१९/०५/२०११ रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.२३ ते ठराव क्र.४४ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०६/२०११

ठराव क्रमांक :- ५५

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (प्रशावि) यांचे दिनांक ०८/०६/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड या तिन्ही नगरपरिषदांची मिळून सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सन १९९८ मध्ये आस्तित्वात आली.तत्कालीन सांगली मिरज आणि कुपवाड नगरपरिषदांचे माजी नगराध्यक्ष,उपनगराध्यक्ष,पदाधिकारी आणि महानगरपालिकांचे पदाधिकारी व विद्यमान सदस्य यांचे दु:खद निधनानंतर त्यांना श्रद्धांजली म्हणून महानगपालिकच प्रशासकीय कामकाज बदं ठेवून सुट्टी जाहिर करावी असा महासभा ठराव क्र.२१० दि.२०/०३/१९९९ अन्वये मंजूरी दिली आहे. त्यानुसार आज पावेतो कार्यवाही ठेवली जात आहे.

महानगरपालिकेचे वाढते दैनंदिन कामकाज व सार्वजनिक सुट्टयांचा विचार करता. याकामी सुधारीत धोरण ठरविणे कामी विषयांकीत प्रस्ताव सादर केला आहे. त्याशी ही सभा सहमती दर्शवित असून, महानगरपालिकेचे वाढते दैनंदिन कामकाज व सार्वजनिक सुट्टयांचा विचार करता तत्कालीन सांगली मिरज आणि कुपवाड नगरपरिषदांचे माजी नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष आणि महानगरपालिका आस्तित्वात आलेपासून मा.महापौर व उपमहापौर आणि विद्यमान सदस्य यांचे दु:खद निधनानंतर त्यांना श्रद्धांजली म्हणून सदर दिवशी प्रशासकीय कामकाज बंद ठेवून सुद्दी जाहिर करणेत यावी असे सुधारीत धोरणास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा धोरणात्मक मान्यता देत आहे.

सूचक :- Keerron

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- ME

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०६/२०११

ठराव क्रमांक :- ५६

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दिनांक ०७/०५/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.३ कुपवाडची लोकसंख्या ७० हजार इतकी आहे. कुपवाड विभागासाठी गावभाग येथे महानगरपालिकेच्या वतीने ॲलोपॅथीक दवाखाना नं.४ सुरु असून, सदर दवाखान्याची वेळ सकाळी ०८ ते १२ व दुपारी ०४ ते ०६ अशी आहे. सदर दवाखान्याचा लाभ तेथील आसपासच्या नागरिकांना होत आहे. वॉर्ड क्र.२४ मध्ये अष्टविनायक नगर,गगांनगर,शामरावनगर इत्यादी परिसर समाविष्ठ असून, सदरचा भाग हा अविकसीत गुंठेवारी झोपडपट्टी सदृश्य आहे. तेथे दवाखान्याची सोय नसल्याने नागरिकांना खाजगी दवाखान्यात जावे लागते. ही वस्तुस्थिती विचारात घेवून सन्मा.सदस्य मा.विष्णू आण्णासाहेब माने यांनी अष्टविनायक नगर, कुपवाड येथे ॲलोपॅथिक दवाखाना सुरु करणेची मागणी केली आहे.

वॉर्ड क्र.२४ अष्टविनायकनगर,कुपवाड येथे महापालिकेच्या वतीने ॲलोपॅथीक दवाखाना सुरु करणेसाठी श्री.बिरु मारुती माने यांनी सर्व करासह रु.२०००/- प्रमाणे १० वर्षे मुदतीने भाडे तत्वावर देणेस लेखी सहमती दर्शविली आहे. त्यानुसार सहाय्यक संचालक नगररचनाकार यांचेकडून मुल्यांकन करुन घेणेत आले असून, सहाय्यक संचालक नगररचनाकार यांनी दि.१३/१२/२०१० चे पत्रानुसार प्रतिमहा र.रु.११००/- याप्रमाणे मासिक भाडे निश्चित केले आहे. त्यानुसार वॉर्ड क्र.२४ अष्टविनायक नगर कुपवाड येथे महापालिकेच्या वतीने ॲलोपॅथीक दवाखाना दुपारी ०४ ते ०६ सुरु करणेसाठी श्री.बिरु मारुती माने यांची जागा प्रतिमहा रु.११००/- मात्रचे भाडेवर भाड्याने घेणेस, सदर दवाखाना चालविणेसाठी कुपवाड गावभाग येथील ॲलोपॅथीक दवाखान्याकडील वैद्यकीय अधिकारी यांनी काम पहाणेचे आहे. त्यास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे. तसेच, दवाखान्याच्या जागेमध्ये आवश्यक असणारे टॉयलेटची सोय संबंधीत जागा मालक यांनी करुन देणेची आहे असे ही सभा ठरवित आहे.

वैद्यकीय आरोग्य - अधिकारी

सूचक :-

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :-१९/६/२०११.

ठराव क्रमांक :- ५७

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१०/०६/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५६ (अ) व या अधिनियमांतील लागू असलेल्या अन्य तरतूदीद्वारे मिळालेल्या अधिकारानुसार मनपा मधील विविध पदांवर करावयाच्या नियुक्त्यांचे नियमन व सेवांची वर्गीकरण करण्यासाठी महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक ठामपा/२००२/८२१/प्र.क्र.८६/ नवि- २३ दि.०२/०७/२००८ अन्वये, मा.महासभा ठराव क्र.२९/ दि.१८/०७/२००९ अन्वये महानगरपालिकेने सेवा प्रवेश नियमांस मान्यता देण्यात आलेली होती. त्यावर दोन महिन्याच्या मुदतीने सूचना / हरकती मागविणेत आलेल्या होत्या. आलेल्या सर्व सूचना / हरकतींचे निराकरण करण्यात येऊन व नियमाप्रमाणे योग्य त्या दुरुस्त्या करण्यात येऊन मनपाचे दुरुस्त सेवा प्रवेश नियम प्रशासनाने तयार केले असून, त्यास मान्यता मिळणेकामी विषयांकीत प्रस्ताव सादर केलेला आहे.

सदरचे सेवाप्रवेश नियमाबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा झाली असून, प्रशासनाने सादर केलेल्या सेवा प्रवेश नियमामध्ये ही सभा पुढील प्रमाणे दुरुस्त्या सुचवित आहे.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०६/२०११

ठराव क्रमांक :- ५८

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (नादानिक) यांचे दिनांक १८/०५/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण ९१ झोपडपट्टया असून, त्यामध्ये असून, त्यामध्ये २९ झोपडपट्टया अघोषित आहेत. झोपडपट्टी धारकांची संख्या ९०७५ इतकी असून, अंदाजे लोकसंख्या ४५८७५ इतकी आहे. केंद्र शासनाने १७५ घरकुले बाह्य मुलभूत व सामाजिक सोयी सुविधेसह बांधणेसाठी अनुक्रमे रु.२.२५ कोटी व र.रु.८५.३४ कोटी रक्कमेच्या प्रकल्प अहवालास मंजूरी दिलेली आहे. प्रकल्पांतर्गत घरकुलाची किंमत शासनाने रु.१लक्ष इतकी निश्चित केली असून, त्यामध्ये मागासवर्गीय लाभार्थी करीता केंद्र शासनाने ८०% राज्य शासनाने १०% व लाभार्थीचा हिस्सा १०% तसेच, खुल्या प्रवर्गातील लाभार्थी करीता केंद्र शासनाने ८०% राज्य शासनाने ८% आणि लाभार्थीचा हिस्सा १२% अशी निश्चित केली आहे.

सदर दोन्ही प्रकल्पामध्ये शासनाने प्रति घरकुलाची किंमत रु.१,२५,०००/- निश्चित केली असून, घरकुलाची बांधकामे र.रु.१ लक्ष मात्रच्या किंमतीमध्ये करण्याचा प्रयत्न करावा व तसे शक्य न झालेस घरकुलाची बांधकामे र.रु.१,२५,०००/- याप्रमाणे करणेस हरकत नाही. तथापि, वाढीव होणारी र.रु.२५,०००/- मात्र महानगरपालिकेने झोपडपट्टीच्या जागा २.५ एफ.एस.आय. चा वापर करुन खाजगी करणातून विकसीत करणेत याव्यात व त्यामधून रक्कम उभी करणेचे प्रयत्न करावेत. तसे न झाल्यास शासनाकडून लागणारी अतिरिक्त रक्कम दिली जाईल असे शासन निर्णय आहेत.

महानगरपालिका क्षेत्रातील केंद्र शासनाच्या आय.एच.एस.डी.पी.योजनेंतर्गत मंजूर असलेल्या घरकुल योजनेसाठी अतिरिक्त लागणारी र.रु.२२ कोटी शासन निर्णयानुसार उभी करणेकामी मान्यता मिळणेसाठी विषयांकीत प्रस्ताव सादर केला आहे. प्रस्तुत प्रस्तावावर सभेमध्ये सविस्तर चर्चा झाली.

महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता उपरोक्त योजनेसाठी अतिरिक्त लागणारी र.रु.२२ कोटी उभारणेकामी प्रशासनाने सूचित केले उपाय योजना विचारात घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१. केंद्र शासनाच्या आय.एच.एस.डी.पी.योजनेंतर्गत मंजूर झालेल्या तसेच प्रस्तावित घरकुल योजनेसाठी राज्य शासनाच्या हिस्स्याचे अनुदान व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (मागासवर्गीय) लाभार्थी यांच्या हिस्स्यांचे अनुदान प्राप्त होणेसाठी शासनाच्या सामाजिक व न्याय विभागाकडे प्रस्ताव सादर करणेत यावा.
२. दलित वस्ती सुधार योजनेमधून १३ व्या वित्त आयोगामधून नगरोत्थान योजनेमधून अतिरिक्त रक्कम उभा करणेसाठी अनुदान प्राप्त होणेसाठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा.
३. शासनाने जरी महापालिकेच्या मालकीच्या जागा खाजगी करणातून विकसीत करणेबाबत निर्देश असले तरी, प्रथम अग्रक्रमाणे वरिल दोन पर्याय उपलब्ध आहेत त्यात प्रशासनाने कसोशीने प्रयत्न करावेत यदाकदाचीत वरिल पर्यायात जर यश प्राप्त झाले नाही तर उर्वरित पर्यायांवर भविष्यात विचार केला जाईल.

नगर अभियंता
(नावानिक)

उपरोक्त योजना पूर्ण करणेकामी अतिरिक्त निधी उभारणेसाठी मा.शासनाकडे तसेच मा.जिल्हाधिकारी यांचेकडे अनुदान प्राप्त होणेसाठी प्रस्ताव सादर करणेस तसेच, याशिवाय निधीची कमतरता भासलेस महापालिकेच्या मागासवर्गीय निधीमधून निधी उपलब्ध करणेस ही सभा धोरणात्मक मान्यता देत आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाने सत्वर ठेवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०६/२०११

ठराव क्रमांक :- ५९

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दिनांक १०/०६/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम विभागाकडील सार्वजनिक विविध कामगिऱ्या कंत्राटदारामार्फत करुन घेणेकामी मक्तेदार नोंदणी करुन प्रमाणपत्र दिले जाते. महासभा ठराव क्र.२४ दि.११/०४/२००८ अन्वये तीन वर्षासाठी नव्याने मक्तेदार नोंदणीसाठी दिलेली मुदत संपली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्र.सी.ए.टी.१०९६/प्र.क्र.१७२/इमा.-२ दि.०४/११/२००२ आणि शासन निर्णय क्र.सी.ए.टी.१०९६/प्र.क्र.१७२/इमा.-२ दि.२१/०५/२००९ अन्वये शासन निर्णयानुसार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दि.०१ एप्रिल २०११ ते मार्च २०१६ या कालावधीसाठी नव्याने देण्यात येणाऱ्या मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्रासाठी खालील प्रमाणे ही सभा मान्यता देत आहे.

१. मक्तेदारांनी त्यांच्या वर्गानुसार आवश्यक असणारी कागदपत्रे, व्यवसाय कर प्रमाणपत्र, काळ्या यादीत नसलेबाबतचे अफिडेव्हीट कमीत-कमी पतदरी,सरासरी तीन वर्षाची उलाढाल व चालू हाती असलेली कामे तसेच, शर्ती-अटी शासन निर्णयाप्रमाणे निश्चित करणे.
२. मक्तेदार नोंदणी फी सार्वजनिक बांधकाम विभाग (महाराष्ट्र शासन) यांचेकडील शासन निर्णय क्र.सीएटी १०९६/प्र.क्र.१७२/(एलबी)२००९/इमा-२ दि.२७/०२/२००९ नुसार नोंदणी फी निश्चित करणेत येत आहे.
३. मक्तेदार नोंदणीसाठी फॉर्म फी वर्ग-क्र.०१ ते ०५ साठी र.रु.२०००/- व वर्ग क्र.०६ ते ०९ साठी र.रु.१०००/- राहील.
४. सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णयानुसार व त्यांनी दिलेल्या प्रमाणपत्रानसार सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना सवलतीनुसार प्रमाणपत्रे देणेत यावे.
५. मिरज तालुक्यातील मजूर सहकारी सोसायटींना शासन निर्णयाप्रमाणे व जिल्हा निबंधक सहकारी संस्था यांचेकडील प्रमाणपत्रानुसार नोंदणी प्रमाणपत्र देणेत यावे.
६. मागील तीन वर्षासाठी नोंदणी प्रमाणपत्र दिलेल्या मक्तेदारांना जुलै २०११ पर्यत मुदतवाढ देणेत येत आहे.
७. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णयानुसार ५ वर्षासाठी मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र देणेत यावे.
८. ज्या मक्तेदारांने ज्या वर्गासाठी नोंदणी केली आहे अशा मक्तेदारांस जास्तीत-जास्त नोंदणी केलेल्या रक्कमेच्या तीनपट इतक्या रक्कमेच्याच कामगिऱ्या देणेत याव्यात.

वरील ०१ ते ०८ अटींची नोंद घेवून प्रशासनाने योग्य ती कार्यवाही ठेवावी असे ही सभा आदेशीत करीत आहे.

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचक :- Kamboon

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०६/२०११

ठराव क्रमांक :- ६०

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दिनांक १०/०६/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्राचा शहर विकास आराखडा (सी.डी.पी.) प्राथमिक प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी क्रिसील रिस्क ॲंड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स् लि.मुंबई या सल्लागार कंपनीची नियुक्ती करणेत आली होती. त्यानुसार सदर कंपनीने प्रकल्प आराखडा सादर केला आहे. सदर प्रकल्प आराखड्यामध्ये महापालिका क्षेत्रामध्ये सद्यस्थितीत चालू असलेल्या योजनांचा तसेच, भविष्यात आवश्यक असलेल्या योजनांचा समावेश करणेत आला आहे. शहर विकास आराखड्याबाबत सभेमध्ये सादक-बाधक चर्चा करुन आवश्यक त्या सूचनासह बदल सूचवून शहर विकास आराखडा अंतीम मान्यतेसाठी शासनाकडे सादर करणेस मान्यता मिळणेकामी विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्याशी ही सभा सहमती दर्शवित असून, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचा क्रिसील रिस्क ॲंड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स् लि.मुंबई या सल्लागार कंपनीने सादर केलेल्या शहर विकास प्रकल्प आराखड्यास ही सभा अंतिम मान्यता देत असून, सदरचा शहर विकास आराखडा मा.शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०६/२०११

ठराव क्रमांक :- ९१

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग मिरज) यांचे दिनांक १०/०६/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज शहराच्या वाढीव हद्दीच्या मंजूर नकाशाप्रमाणे मिरज स.नं.५०/२अ/१अ व ५०/२ब/१ या जागेवर आरक्षण क्र.ए -६ क्रिडांगण या आरक्षणाने आरक्षीत होते. आरक्षणा खालील ३८५० चौ.मी.जागेची नुकसान भरपाई मिळणेकामी सदर जागेचे मालक श्रीमती जयश्री सुरेश चौगुले यांनी दि.१७/१२/२००५ अन्वये विनंती अर्ज दिलेला होता. सदर अर्जास अनुसरुन सन २००६ चे बाजारमुल्यानुसार र.रु.१८,११,२००/- मात्र नुकसान भरपाई देणेस मान्यता मिळणेसाठी प्रशासनाने विषयपत्र सादर केले होते. सदरचे विषयपत्र दि.२८/०१/२००८ रोजीच्या महासभेपुढे निर्णयासाठी ठेवले असता, महासभा ठराव क्र.१९३ दि.२८/०१/२००८ अन्वये सदरचा प्रस्ताव नामंजुर करणेत आला आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये प्रसिद्ध केलेल्या प्रारुप विकास योजनेमध्ये आरक्षण क्र.३९८ क्रिडांगण या नावाने आरक्षीत ठेवले असून, उक्त अधिनियमातील कलम २८ (४)अन्वये महासभा ठराव क्र.१९४ दि.२८/०१/२००८ नुसार स.नं.५० मधील क्रिडांगणाचे क्षेत्र वगळून स.नं.४० मध्ये लहान मुलांचे क्रिडांगण या वापरासाठी आरक्षीत ठेवले आहे. त्यानुसार फेर बदल करुन सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची प्रारुप विकास योजना अधिनियमातील कलम ३०(१) अन्वये अंतीम मान्यतेसाठी सादर केली आहे.

तद्नंतर महासभा ठराव क्र.१०८ दि.१६/११/२००९ नुसार स.नं.५० या जमिनीवर आरक्षण क्र.३९८ क्रिडांगण आरक्षण प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेप्रमाणे कायम ठेवावे असा निर्णय झालेला आहे. प्रारुप विकास आराखड्यास अद्यापही शासनाची मान्यता झालेली नाही.

महासभा ठराव क्र.१९३ दि.२१/०१/२००८ अन्वये आरक्षीत जागेची नुकसान भरपाई देणेस महासभेने विषयपत्र नामंजूर केलेने, श्रीमती जयश्री सुरेश चौगुले व इतर यांनी मा.लोकायुक्त,महाराष्ट्र राज्य यांचेकडे दि.१९/१२/२००८ रोजी तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीची सुनावणी होवून,एकतर महानगरपालिकेने तक्रारदार यांना जमिन परत करावी अथवा नुकसान भरपाईची रक्कम त्वरीत द्यावी असे निर्देश दिलेली आहेत. त्यानुसार धोरणात्मक मान्यता मिळणेकामी विषयांकीत प्रस्ताव सादर केला आहे.

प्रस्तुत विषयी सभेमध्ये सविस्तर चर्चा झाली. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची प्रारुप विकास योजना कलम ३०(१) अन्वये अंतीम मान्यतेसाठी मा.शासनाकडे सादर केली आहे. त्यास अद्यापही मान्यता मिळालेली नाही. महानगरपालिकेस भविष्यात सार्वजनिक प्रयोजनासाठी विषयांकीत जमिन मागीतलेस ती देणेची तक्रारदार यांचे वटमुखत्यारधारक यांनी सहमतीही दर्शविलेली आहे. ही बाब विचारात घेणे या सभेस उचित वाटते विषयांकीत कामी मा.लोकायुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशाचा ही सभा आदर करते. तथापि, महापालिकेने मा.शासनाकडे सादर केलेल्या प्रारुप विकास आराखड्यास अद्यापही मंजूरी मिळाली नसल्यामुळे मा.उच्च न्यायालयात मा.लोकायुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे निर्णया विरुद्ध याचिका दाखल करुन महापालिकेच्या वतीने सविस्तर कैफियत मांडणेत यावी असे ही सभा सूचीत करते त्यास व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

सह.संचालक
नगररचना

अनुमोदक :-

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०६/२०११

ठराव क्रमांक :- ६२

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सूचना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय किर्तीच्या डेक्कन सोसायटी ऑफ गॅस्ट्रोइंटेस्टिनल इंडोस्कोपीस्ट (पोटविकार तज्ञ) या संस्थेमार्फत दि.२३ व २४ जुलै २०११ रोजी वानलेसवाडी भारती विद्यापिठ येथे कार्यशाळेचे आयोजन केले आहे. सदर कार्यशाळेमध्ये मोफत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहे. यासाठी कार्यशाळेमध्ये आंतरराष्ट्रीय किर्तीचे पोटविकार तज्ञ उपस्थित राहून रुग्णांवर विविध शस्त्रक्रिया मोफत करणेत येणार आहेत. मोफत शस्त्रक्रियेच्या कार्यशाळेचा बहुमान सांगली शहरास प्रथमच मिळत असून, यामध्ये प्रचंड खर्चीक शस्त्रक्रिया मोफत होणार असून, त्यामुळे महापालिका क्षेत्रातील रुग्णांना तसेच सांगली जिल्हा आणि रत्नागिरी,कोल्हापूर,सोलापूर,सातारा,गोवा,सिंधुदूर्ग, बेळगाव,विजापूर येथील पेशंट व डॉक्टर्सना सुद्धा या शिबीराचा लाभ होणार आहे.या कार्यशाळेमधील शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असणारी अत्याधुनिक उपकरणे लॅप्रोस्कॉपी सेटस् व इंडोस्कोपी इंन्स्ट्रुमेंटस् महापालिका क्षेत्रात घेवून येणेसाठी जकात माफ करणेविषयी डेक्कन सोसायटी ऑफ गॅस्ट्रोइंटेस्टिनल इंडोस्कोपीस्ट या संस्थेने लेखी अर्जाने विनंती केली आहे. त्याशी ही सभा सहमती दर्शवित आहे.

मोफत शस्त्रक्रियेच्या कार्यशाळेचा बहुमान सांगली शहरास प्रथमच मिळत आहे. त्यामुळे महापालिका क्षेत्रातील आणि सांगली जिल्हा व आजूबाजूच्या परिसरातील गरीब गरजू रुग्णांना मोफत शस्त्रक्रिया व कार्यशाळेचा लाभ होणार असून, त्याच बरोबर महापालिका क्षेत्रातील वैद्यकीय तज्ञाना यांचे मार्गदर्शन होणार आहे. या कार्यशाळेसाठी आधुनिक उपकरणे सांगली शहरात आयात होणार असून, शस्त्रक्रियेनंतर ती पुन्हा मनपा हद्दीबाहेर त्या डॉक्टरांचे सोबत जाणार आहेत. अशा या शिबीरास सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचा मदतीचा हात म्हणून सदर शिबीरासाठी आवश्यक असणारे अत्याधुनिक उपकरणे महापालिका क्षेत्रात आयात करणेसाठी जकात माफी देणे या सभेस उचित वाटते. सबब, महानगरपालिकेच्या क्षेत्रातील वानलेसवाडी भारती विद्यापिठ मध्ये आंतरराष्ट्रीय किर्तीच्या डेक्कन सोसायटी ऑफ गॅस्ट्रोइंटेस्टिनल इंडोस्कोपीस्ट (पोटविकार तज्ञ) या संस्थेमार्फत दि.२३ व २४ जुलै २०११ रोजी आयोजित केल्या जाणाऱ्या शस्त्रक्रियेच्या कार्यशाळेस शिबीराच्या कालावधीसाठी सदर संस्थेने मागणी केलेनुसार शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असणारी परिशिष्ठ-अ मधील लॅप्रोस्कॉपी सेटस् आणि परिशिष्ठ-ब मधील इंडोस्कोपी इन्स्ट्रुमेंटस् महापालिका क्षेत्रात आयात करणेस जकात माफी देणेत येत असून, सदरची अत्याधुनिक उपकरणे शस्त्रक्रियेनंतर महापालिका क्षेत्राबाहेर निर्यात करणेस ही सभा मान्यता देत आहे. सदर निर्णयाप्रमाणे प्रशासनाने योग्यती कार्यवाही ठेवणेची आहे.

जकात अधिक्षक
सदरचा ठराव मा. आयुक्तसो यांचे निदर्शनास आणून कार्यवाही व्हावी.

सूचक ..

ठराव बहुमताने मंजुर

अनुमोदक ..

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०६/२०११

ठराव क्रमांक :- ६३

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (नादानिक) यांचे दि.१५/०६/२०११ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण ९२ झोपडपट्टया असून, त्यामध्ये २६ झोपडपट्टया घोषीत आणि ६६ झोपडपट्टया अघोषीत आहेत. एकूण झोपडपट्टी धारकांची संख्या ९८८० इतकी असून, लोकसंख्या अंदाजे ५०,००० इतकी आहे. लोकआवास योजनेंतर्गत १२०,वॅम्बे योजनेंतर्गत २१२८, आय एच.एस.डी.पी.योजनेंतर्गत ३९७३ आणि राजीव आवास योजनेंतर्गत ३६५९ झोपडपटटी धारकांचे पुनर्वसन प्रस्तावित केले आहे.

महानगरपालिका झोपडपट्टी मुक्त होण्यासाठी राज्यातील २३ महानगरपालिकेची निवड करणेत आली असून, त्यामध्ये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचा समावेश करणेत आला आहे. महापालिका क्षेत्र झोपडपट्टी मुक्त होण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत राजीव आवास योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करणेसाठी केंद्र शासनाकडून र.रु.४०,००,०००/- इतकां निधी मंजूर केला असून, त्यापैकी र.रु.१०,२०,०००/- इतका निधी महापालिकेस प्राप्त झाला आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शन तत्वानुसार राजीव आवास योजनेची अंमलबलावणी प्रभावीपणे राबविणेसाठी योजनेचा अंमलबजावणी पूर्वी महानगरपालिका क्षेत्रातील विषयांकीत योजनेंतर्गत समावेश असलेचा झोपडपट्टी सर्वेक्षणाकरीता स्वयंसेवी संस्थेची नियुक्ती करणे,तांत्रिक सेल सुरु करणेकरीता नियुक्त करणे आणि योजनेचा तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करणेकरीता सक्षम अनुभवी कन्सलटंटची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सबब, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महानगरपालिका क्षेत्रामध्ये केंद्र शासन पुरस्कृत राजीव आवास योजना राबविणेस व त्यास अनुसरुन अनुषंगिक कार्यवाही अनुसरण्यास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा धोरणात्मक मान्यता देत आहे.

नगरसचिव (नादानिक)

सूचक :

महापालिका सचिव
नाशिक महानगरपालिका

अनुमोदक :

ठराव बहुमताने मंजुर

महापौर,